दै. देशोन्नती दि. ०३/०९/२०२२

# सिडकोतील वाईन शॉपच्या व्यवस्थापकावर चाकु हल्ला करुन खून; तिघेजण ताब्यात

## हल्लेखोर सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद; खा. चिखलीकरांची घटनास्थळाला भेट

देशोन्नती वृत्तसंकलन...





**नांदेड** ■ नांदेड ग्रामीण ठाण्याच्या हद्दीत असलेल्या ढवळे कॉर्नर परिसरातील एका वाईनशॉपच्या व्यवस्थापकावर चाकु हल्ला करुन त्यांचा खून केल्याची घटना १ सप्टेंबर रोजी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास घडली. यातील हल्लेखोर सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी घटनास्थळाला भेट देवून आरोपीचा तात्काळ शोध लावून अटक करण्याचे निर्देश पोलिस प्रशासनाला दिले असून यामध्ये ३ आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे पुतणे माजी नगरसेवक संदिप चिखलीकर यांचे ढवळे कॉर्नर परिसरात प्रदिप वाईन शॉप नावाचे दुकान अस्तीत्वात आहे. या दुकानात संदिप चिखलीकर यांचे मावसभाऊ माधव वाकोरे रा.काटकळंबा हे व्यवस्थापक म्हणून जबाबदारी सांभाळतात. ते नेहमीप्रमाणे १ सप्टेंबर रोजी दुकानात असतांना रात्री ८.३० वाजताच्या सुमारास आलेल्या साई इंगळे याने टु बर्ग कंपनीच्या बियरची मागणी केली. यावेळी त्या कंपनीचे बियर नसल्याचे म्हटल्यानंतर साईने तुझे दुकान बंद कर म्हणून वाद घालून निघून गेला. त्यानंतर रात्री ९.३० वाजताच्या सुमारास मोटारसायकलवर आलेल्या पप्या उर्फ प्रेमसिंग सपुरे व इतर तिघांच्या मदतीने सदर तरुण दुकानात घुसल्यानंतर येथील कर्मचाऱ्यांना बाहेर येण्यास सांगितले. परंतू कोणी बाहेर येत नसल्याचे पाहून साईनाथ गुडमलवार यांना मारहाण करुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला. परंतू कशीबशी त्यांनी सुटका करुन घेतली. त्यानंतर माधव जीवनराव वाकोरे (३२) यांना कॉलर धरुन ओढत रस्त्यावर आणुन त्यांच्या पोटावर चाकुने सपासप वार केला. या घटनेत रक्ताच्या थारोळ्यात वाकोरे हे रस्त्यावरच कोसळले. यावेळी दुकानातील इतर कामगारांनी तात्काळ वाहनातून उपचारासाठी रुग्णालयात घेवून जाण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा रस्त्यातच मृत्यू झाला. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून आरोपी सीसीटिव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. यावेळी खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी घटनास्थळाला भेट देवून आरोपींना ताब्यात जेरबंद करण्याचे निर्देश पोलिसांना दिले. यावेळी पोलिस अधिक्षक प्रमोदकुमार शेवाळे, अप्पर पोलिस अधिक्षक निलेश मोरे, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. विश्वंभर भोरे, स्थागुशाचे पोनि द्वारकादास चिखलीकर व त्यांचे पथक ग्रामीण ठाण्याचे पोनि अशोक घोरबांड, शिवाजीनगर ठाण्याचे सपोनि रवि वाहुळे, संजय निलपत्रेवार यांच्यासह असंख्य पोलिस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. घटनेनंतर आरोपींचा शोध घेण्यासाठी सर्वत्र नाका बंदी करण्यात आली होती. दरम्यान रात्री उशिरापर्यंत ३ आरोपींना ताब्यात घेतले असून या प्रकरणी साईनाथ गुडमलवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण पोलिसांनी ५ जणाविरुध्द गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा पुढील तपास पोउपनि विजय पाटील हे करीत आहेत.

### एकीकडे रस्त्यावरील तळीरामाची पोलिसांकडून धुलाई तर दुसरीकडे खुनाची घटना

शहरातील भररस्त्यावर दारुड्याची शाळा भरत असल्याची चर्चा एका व्हॉट्सॲप ग्रुपवर दिवसभरात सुरु होती. त्या अनुषंगाने ग्रामीण ठाण्याचे पोनि अशोक घोरबांड यांनी ग्रामीण ठाण्याच्या हद्दीत भररस्त्यावर दारु ढोसणाऱ्यांची व त्यांना सेवा पुरविणाऱ्यांची धुलाई केली. सदर कारवाई पुर्णत्वात येत असतांनाच ज्या कारणावरुन पोलिसांनी धुलाई सुरु केली. त्यापैकी एका वाईन शॉपच्या व्यवस्थापकाचा खून केल्याची घटना घडल्याने एकच खळबळ उडाली असून यांची पुनावृत्ती होवू नये. यासाठी शहरातील इतर पोलिसांनी आता खबरदारी घेणे गरजेचे आहे.

मधुमेह मुक्त आयुष्य
Diabetes Free Life

